# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
विभागीय केंद्र, नागपुर
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, हनुमान नगर, नागपुर - ४४०००३
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
Regional Centre, Nagpur
Govt.Medical College,Hanuman Nagar,Nagpur – 440 003
Phone & Fax : 0712-2752929, Email : rc_nagpur@muhs.ac.in


**जा.क्र.मआविवि/वि.कें./नागपुर/FIST/102/2025** **दिनांक : 10/01/2025.**

**दरपत्रक सुचना**

**विषय :- First International Symposium on Trible Health MUHS FIST 25 या परिसंवाद कार्यक्रमाच्या अभ्यांगतांसाठी वाहन व्यवस्था पुरविण्याच्या अनुषंगाने दरपत्रकं मागविण्याबाबत...**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, विभागीय केंद्र, नागपूर मार्फत दि. ३१ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित First International Symposium on Trible Health MUHS FIST 25 या परिसंवाद कार्यक्रमाच्या अभ्यांगतांसाठी वाहन व्यवस्था दि. ३०/०१/२०५ ते ०३/०२/२०२४ करिता पुरविण्याकरिता विविध पुरवठेदारांकडून मोहोरबंद दरपत्रकं मागविणेत येत आहे.

पुरवठा करावयाच्या व्यवस्थेबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे. सदर व्यवस्थेकरिता सोबत जोडलेल्या विहित नमून्यामध्ये दर सादर करावेत.

| अ.क्र. | तपशिल | दर १५ तास /१०० कि.मी. दैनिक दर (रु.) | १०० कि.मी. च्या वर प्रती कि.मी. दर (रु.) | जीएसटी | जीएसटी सह एकुण किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | इन्होवा क्रिस्टा | | | | |
| २. | इन्होवा | | | | |
| ३. | स्विफ्ट डिजायर | | | | |
| | एकुण रक्कम | | | | |

(टिपः १) उक्त तक्त्यातील वस्तुंकरिता बाबीनिहाय अथवा एकत्रित न्यूनतम दर स्वीकारण्याचे अधिकार मआविवि विभागीय केंद्र, नागपूर यांना राहतील.२) उक्त दर हे एका वाहनासाठी असून मआविवि विभागीय केंद्र नागपूरसाठी आवश्यक वाहनांची संख्या वेळोवेळी कळविण्यात येईल. त्यानुसार वाहन प्रकार व मागणीनुसार तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.)

**डॉ. संजिव चौधरी,**
**चेअर प्रोफेसर तथा आयोजन सचिव, एमयुएचएस फिस्ट २५**
**मआविवि विभागीय केंद्र, नागपूर**

**प्रत :**

**१) कार्यालयीन नोटीस बोर्ड**
**२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नोटीस बोर्ड**
**३) वैद्यकिय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नोटीस बोर्ड**
**४) एमयुएचएस फिस्ट २५ वेबसाईट – www.muhsfist25.com**

दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-

१. एका पुरवठादाराचे फक्त एक दरपत्रक स्विकारण्यात येईल. एकाच पुरवठादाराने एकापेक्षा जास्त दरपत्रकं सादर केल्यास सदर पुरवठादाराची सर्व दरपत्रकं अग्राहय समजण्यात येतील. खरेदी प्राधिकाऱ्यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत, दरपत्रकातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत, तसेच एकल दरपत्रक सादर करीत असल्याबाबत सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार हमीपत्र दरपत्रकासोबत लिफाफ्यात देणे बंधनकारक राहील.

२. दरपत्रक दोन स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात खालील दस्तऐवजांसह स्वप्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे.
अ) तांत्रिक लिफाफा ब) व्यापारी दरांचा लिफाफा

३. मोहरबंद तांत्रिक लिफाफ्यात खालील दस्तऐवज स्वप्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे.
अ) GST नोंदणी प्रमाणपत्र ब) पॅन कार्ड क) वरिल मुद्दा क्र १ नुसार हमीपत्र ड) दुकान नोंदणी प्रमाणपत्र (Shope Act Registration Certificate)

४. पुरवठादाराने इतर कोठेही दर नमूद न करता, सोबत जोडलेल्या विहित नमून्यामध्येच सही व शिक्क्यासह प्रमाणित करुन व्यापरी दरांचा लिफाफ्यातच दर सादर करणे आवश्यक आहे. विहित नमून्यात सादर न केलेली दरपत्रके अग्राहय समजण्यात येतील.

५. वरिलप्रमाणे तांत्रिक व व्यापारी लिफाफे हे दोनही लिफाफे स्वतंत्र तिसऱ्या लिफाफ्यात घालून लिफाफा मोहरबंद करावा व लिफाफ्यावर **" First International Symposium on Trible Health MUHS FIST 25 या परिसंवाद कार्यक्रमाच्या अभ्यांगतांसाठी वाहन व्यवस्था पुरविण्याकरिता दरपत्रक"** असे नमूद करावे. तसेच, पाकिटावर पुरवठादाराचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.

६. मोहोरबंद दरपत्रकं "चेअर प्रोफेसर तथा आयोजन सचिव, एमयुएचएस फिस्ट २५" मआविवि विभागीय केंद्र, नागपूर यांचे नावाने दि. 16/01/2025 वेळ दु. ४.०० वाजेपावेतो पाठवावीत.

७. दरपत्रकात पुरवठादाराने स्वतःच्या कोणत्याही अटी व शर्ती नमूद करु नयेत. अटी व शर्ती नमूद केलेली दरपत्रकं स्विकारली जाणार नाहीत.

८. सदर वाहनांच्या वाहन चालकांचे भत्ते पुरवठादाराने देणे आवश्यक राहील.

९. उक्त सर्व वाहने सुस्थितीत असणे आवश्यक राहील.

१०. परिवहन नियमांनुसार सर्व वाहनांची कागदपत्रे अद्ययावत असणे बंधनकारक राहील.

११. आवश्यक वाहन व्यवस्थेसाठी सादर केलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत.

१२. आवश्यक सेवेचा पुरवठा योग्यरितीने झाला असल्याचे प्रमाणित केल्यानंतर देयक अदा करण्यात येईल. तसेच जीएसटी, आयकर, विविध प्रकारचे कर शासन नियमानुसार कपात करण्यात येतील. अपवादात्मक परिस्थितीमुळे देयक अदा करण्यास विलंबापोटी कोणत्याही स्वरुपाचे व्याज अथवा अतिरिक्त शुल्क/रक्कम मआविवि विभागीय केंद्राकडून अदा केली जाणार नाही. याप्रकारची कोणतीही मागणी मान्य करता येणार नाही.

१३. दरपत्रकावर रक्कम अंकात व अक्षरात नमूद करण्यात यावी.

१४. उक्त वाहन व्यवस्था पुरविण्यासाठी अगोदर कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम पुरठादारास देण्यात येणार नाही.

१५. दरपत्रकाच्या अटींमध्ये आवश्यकतेनुसार अंशतः बदल करण्याचे, कोणतेही कारण न देता दरपत्रकं स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे, कोणत्याहीस्तरावर खरेदीप्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार मआविवि विभागीय केंद्र, नागपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

१६. मआविवि विभागीय केंद्र, नागपूरसाठी आवश्यक वाहनांची संख्या वेळोवेळी कळविण्यात येईल. त्यानुसार वाहन प्रकार व मागणीनुसार तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

१७. सदर दरपत्रक सुचना www.muhsfist.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**चेअर प्रोफेसर तथा आयोजन सचिव, एमयुएचएस फिस्ट २५**
**मआविवि विभागीय केंद्र, नागपूर**

## पुरवठादाराने सदर दरपत्रक आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सादर करावे

### दरपत्रक

जा.क्र. दि. / /

प्रति,
चेअर प्रोफेसर तथा आयोजन सचिव
एम.यु.एच.एस. फिस्ट-२५,
मआविवि, विभागीय केंद्र,
नागपूर - ४४०००३

**विषय : First International Symposium on Trible Health MUHS FIST 25 या परिसंवाद कार्यक्रमाच्या अभ्यांगतांसाठी वाहन व्यवस्था पुरविण्याकरिता दरपत्रक मागविण्याबाबत**
**संदर्भ : मआविवि, वि.कें., नागपूर दरपत्रक सुचना क्र.** FIST-102 **दि.** 10/01/2025.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या दरपत्रकातील अटी व शर्ती मला मान्य असून मआविवि विभागीय केंद्र, नागपूर मार्फत आयोजित First International Symposium on Trible Health MUHS FIST 25 या परिसंवाद कार्यक्रमाच्या अभ्यांगतांसाठी वाहन व्यवस्था पुरविण्याकरिता खालील प्रमाणे दर सादर करीत आहे.

| अ.क्र. | तपशिल | दर १५ तास /१०० कि.मी. दैनिक दर (रु.) | १०० कि.मी. च्या वर प्रती कि.मी. दर (रु.) | जीएसटी | जीएसटी सह एकुण किंमत (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १. | इन्होवा क्रिस्टा | | | | |
| २. | इन्होवा | | | | |
| ३. | स्विफ्ट डिजायर | | | | |
| | एकुण रक्कम | | | | |

(टिपः १) उक्त तक्त्यातील वस्तुंकरिता बाबीनिहाय अथवा एकत्रित न्यूनतम दर स्वीकारण्याचे अधिकार मआविवि विभागीय केंद्र, नागपूर यांना राहतील.२) उक्त दर हे एका वाहनासाठी असून मआविवि विभागीय केंद्र नागपूरसाठी आवश्यक वाहनांची संख्या वेळोवेळी कळविण्यात येईल. त्यानुसार वाहन प्रकार व मागणीनुसार तात्काळ पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.)

**दिनांक :**

**ठिकाण :**

**पुरवठेदाराचे नावः**

**फर्मचे नाव :**

**स्वाक्षरी :**

**शिक्का :**

<u>सदर हमीपत्र पुरवठादाराने आपल्या फर्मच्या लेटरहेडवर सादर करावे</u>

जा.क्र. दि. / /

प्रति,
चेअर प्रोफेसर तथा आयोजन सचिव
एम.यु.एच.एस. फिस्ट-२५,
मआविवि, विभागीय केंद्र,
नागपूर - ४४०००३

**विषय :** हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत, अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व एकल निविदा सादर करित असल्याबाबत हमीपत्र सादर करणेबाबत...
**संदर्भ :** मआविवि वि.कें. नागपूर दरपत्रक सुचना क्र. Fist-102 दि. 10/01/2025 .

मआविवि विभागीय केंद्र, नागपूर च्या उक्त दरपत्रक सूचनेतील अटीनुसार, मी खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहे.

## - हमीपत्र -

याद्वारे हमी देण्यात येते की, संदर्भीय दरपत्रक प्रक्रियेसाठी मी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्या फर्मशी निगडीत कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अशाप्रकारे दुसरे दरपत्रक सादर केलेली नाही. तसेच, माझे / आमचे आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य / खोटी आढळून आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी / आम्ही पात्र राहू. दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती मान्य असून, दरपत्रकामध्ये सादर केलेली माहिती, दस्तऐवज, करारनामे इ. भविष्यात असत्य / बनावट / अवैध आढळून आल्यास सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी / आम्ही पात्र असू. तत्संबंधी माझी / आमची कुठलीही हरकत राहणार नाही.

**अधिकृत व्यक्तीचे नाव**

**स्वाक्षरी**

**शिक्का**